# बदलत्या परिस्थितीत शिक्षक प्रशिक्षकांच्या भूमीकेत बदल

**प्रा. संजय पु. शेडमाके,**
**पी. व्ही. डी. टी. शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**मुंबई – 20.**

आज शिक्षण पद्धतीवर दृष्टीक्षेप टाकला तर बरीच स्थित्यंतरे घडलेली दिसून येतात. विद्यार्थी, शिक्षक व शैक्षणिक वातावरण यामध्ये बराच बदल झाला आहे आणि हा बदल स्वाभाविकच आहे. शिक्षणाच्या मिळणा–या घटनात्मक संधी व त्याचा विस्तार वाढला आहे. गुरुकुल पद्धती जरी चांगली व चारित्र्यवान विद्यार्थी निर्माण करणारी असली तरी वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेता आज तरी विशिष्ट गट घेवून ज्ञानदानाचे कार्य करणे गुरुला शक्य नाही. आज विद्यार्थी संख्या वाढली आहे. त्याच प्रमाणात शाळांचा व्याप वाढला, व्याप सांभाळणारे शिक्षक वाढले आहेत व शिक्षण पद्धतीमध्ये सुद्धा अमुलाग्र बदल झाला. एका वर्गात शंभर विद्यार्थी कोंबून आमच्या शिक्षकांना ज्ञानदानाचे कार्य करावे लागते आहे. मग अशा परिस्थितीस आम्हास बदलणे आवश्यक आहे का ? या प्रश्नाचे उत्तर शोधणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधावयाचा म्हणजे ब्लुमने सांगीतल्या प्रमाणे बोधात्मक, भावात्मक व क्रियात्मक पातळीवर विकास होणे आवश्यक आहे पण आजची स्थिती पाहता बोधात्मक विकासावर भर दिला जातो त्यामुळे माझा विद्यार्थी कुठेतरी कमकुवत राहिला आहे. विद्यार्थी जर सक्षम नागरिक म्हणून निर्माण व्हावे असे प्रामाणिकपणे वाटत असेल तर शिक्षक प्रशिक्षक म्हणून माझ्या भूमीकेत बदल घडवून आणणे आवश्यक वाटते.

शिक्षक प्रशिक्षकांची भूमिका सक्षम वटविण्यासाठी प्रशिक्षकांमध्ये खालील गुणांची आवश्यकता आहे.

- विषयाचे पुरेसे ज्ञान
- अध्यापन तंत्राचे समग्रज्ञान
- मानवी विकास व अध्ययन प्रकियेचे ज्ञान
- संप्रेषण कौशल्य हाताळण्याचे ज्ञान
- मानवीय संबंध जुळवण्याचे कौशल्य
- संशोधन व समस्या निराकरण कौशल्य
- परिणामकारक कार्यशैली
- विद्यार्थी जीव्हाळा
- व्यवसायाबदद्ल आत्मीयता
- आशय व विषयाबदद्ल विश्वास
- शाळा व समाजाची सांगड घालण्याचे कौशल्य
- सहकार्यता वाढविण्यावर भर

वरील सर्वगुण शिक्षकांमध्ये असणे आवश्यक आहेतच, पण मग आमचा विद्यार्थी सुसंस्कारित किंवा परिपूर्ण नागरिक म्हणून समाजामध्ये का वावरत नाही ? या प्रश्नाचे उत्तर शोधणे एवढे सोपे नाही.

व्यावसायिक प्रशिक्षण घेवून सुद्धा आपल्या शिक्षकी व्यवसायावर किती शिक्षक प्रशिक्षकांची श्रद्धा आहे ? आपल्याला असणा–या आशय – विषयावर आमचा किती विश्वास आहे ? अध्यापन पद्धतीचा आम्ही प्रामाणिकपणे कधी विचार केला का ? समाज परिवर्तनाकरीता किंवा सक्षम नागरिक निर्माण करण्याकरीता प्रशिक्षित शिक्षकाची खरोखरच आवश्यकता आहे का ? वर्गातील संख्या 100 झाली म्हणून आम्ही सक्षम चारित्र्यवान शिक्षक खरोखरच निर्माण करु शकणार नाही का ? विद्यार्थ्यांचे वर्तनपरिवर्तन खरोखरच मोठया वर्गात शक्य नाही का ? या प्रश्नांची होकार्थी उत्तर मिळविण्यासाठी शिक्षक प्रशिक्षकांना आपल्या भूमिका समजून घेवून त्यात बदल करणे शक्य आहे का ?

वरिल काही प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी 23.02.1876 ला जन्म घेतलेला, कुठल्याही विद्यापीठाची पदवी न घेतलेला कोणत्याही शिक्षण महाविद्यालयातून अध्यापनाचे प्रशिक्षण न घेतलेले थोर ' निरक्षर शिक्षकाचा ' आपणास विचार करावा लागेल. असे शिक्षक म्हणजे डेंबूजी उर्फ गाडगेबाबा. त्यांची शिकवण देण्याची पद्धती कशी होती याचा परिचय आम्हा सर्व शिक्षक प्रशिक्षकांना आहे पण, आम्ही त्यांच्या अध्यापन पद्धतीचा, संप्रेषण कौशल्याचा विचार केला नाही. आपण फक्त अनुकुल वातावरणात अध्ययन कार्यास बसलेल्या 100 विद्यार्थ्यांचा विचार करुन ओरड करतो पण समोर बसलेल्या हजार – पाचशे प्रतिकुल परिस्थितील असलेले निरक्षर विद्यार्थ्यांच्या वर्तन परिवर्तनाची ताकद गाडगे बाबांच्या संप्रेषण कौशल्यात होती. जरी आमची अध्यापन पद्धती, आमचे संप्रेषण कौशल्य त्यांच्यासारखे समजत असू तर आमच्या साक्षर विद्यार्थ्यांत परिवर्तन का करु शकले नाही ? गाडगे बाबांनी समाज परिवर्तनाची ताकद कशी निर्माण केली असावी याचा डोळसपणे विचार करावा लागेल व त्याचा संक्षेपाने विचार करणे गरजेचे आहे.

**निरक्षर लोक शिक्षक :**

- कोणतीही पदवी नसलेली पण परिवर्तनाची इच्छा
- कष्ट करण्याची सदैव तयारी
- परिसराचे व तेथिल परिस्थितीचे ज्ञान प्राप्त करुन घेण्याची इच्छा
- लोकांची मानसिकता जाणून घेणे
- लोकांच्या जीवनातील उदाहरणे लक्षात घेवून संप्रेषण
- समूहाला आनंद देणारी अध्यापन पद्धती
- संप्रेषणाकरीता चिपडयांचा नाद व कृतीकरीता 'खराटा'
- निरक्षर लोकांचा सहभाग वाढविण्यावर भर
- सभिनय सादरीकरण
- प्रश्नोत्तर पद्धतीचा वापर व संवाद कौशल्य
- उक्ती प्रमाणे कृतीवर विश्वास

➢ परिवर्तनाबददल संय्यम व विश्वास

आजही प्रत्येक शिक्षण महाविद्यालयामध्ये गाडगेबाबा आहेत पण फक्त वर्गामध्ये किर्तने करण्यासाठी व साक्षर विद्यार्थी – श्रोते पेंगण्यासाठी आमचा शिक्षक प्रशिक्षक सॉक्रेटिस माहिती असला तरी सॉक्रेटिस झाला नाही. रुसो – टागोरसारखा कधी विद्यार्थ्यांला कृतीत सहभागी करुन घेत नाही. मॉटेसरी सारखा विद्यार्थी तो कधीच झाला नाही. माझा शिक्षक प्रशिक्षक सदैव मोठा होवूनच शिकवायला लागला त्यामुळे तो अनुकुल परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या ह्रदयापर्यंत पोहचू शकला नाही. मात्र गाडगे बाबांना सॉक्रेटिस, मॉटेसरी, रुसो माहिती नसतांना सुद्धा शिक्षणाचा गंध नसलेला निरक्षर विद्यार्थी, बौद्धिक वय कमी असलेला प्रतिकुल परिस्थित वावरणा–या विद्यार्थ्यांसाठी गाडगेबाबा सॉक्रेटिस, मॉटेसरी, रुसो झाल्याचे आढळते. अध्यापन पद्धती चार भिंतीत न शिकलेले निरक्षर शिक्षकांची अध्यापन पद्धती उदाहरणासाठी घेता येईल. संप्रेषण कौशल्य लक्षात घेण्यासारखे आहे.

बाबा – देव किती ?
श्रोते – एक
बाबा – तुमच्या गावी खंडोबा आहे का ?
श्रोते – आहे
बाबा – मग देव किती झाले ?
श्रोते – दोन
बाबा – आपल्या गावात भैरोबा आहे का
श्रोते – आहे
बाबा – मग देव किती झाले ?
श्रोते – तीन
बाबा – आपल्या गावी म–याई आहे का ?
श्रोते – आहे
बाबा – मग देव किती झाले ?
श्रोते – चार

श्रोत्यांचा आधार घेत – घेत जगाची सुत्रे चालविणारी शक्ती एकच आहे असे बाबा श्रोत्यांना पटवून देतात.

आम्ही कधी अशी अध्यापन पद्धती वापरली का ? आपण किर्तनाच्याच पद्धतीचा गुरफटून गेलो ? सॉक्रेटिस आमच्या पुस्तकातच बंदिस्त राहिला. आम्ही किर्तनकार व आमचा भावी शिक्षक श्रोता नाही का ? तरी बदलण्याची गरज वाटत नाही का ? या सर्वांची उत्तरे होकार्थी आहे. त्यामुळे आम्हाला बदलावेच लागेल.

करावे काय शिक्षण । जे कधी कामास येईना
पुस्तके पाठ करुनिही । लाभा अंती नसे कोणा

– श्री गुरुदेव मासिक – 1970 पृष्ठ 1

अशा शिक्षणाची गरज आहे का ?

याच साठी शिक्षण घेणे । की जीवन जगता यावे सुंदरपणे
दुबळेपण घेतले आंदणे । शिक्षण त्यासी म्हणो नयं

– ग्रामगीता अध्याय 19, ओवी 21

शिक्षण म्हणजे जीवन व ते जगण्यासाठी उपयोगी पडले पाहिजे असा उपदेश थोर शिक्षण तज्ञ व समाजतज्ञ संत तुकडोजी देतात. ते पुढे असे ही म्हणतात.

नुसते नको उच्च शिक्षण । हे तो गेले मागील युगे लपोन
आता व्हावा कष्टिक, बलवान । सुपुत्र भारताचा

जर असे असेल तर माझ्या शिक्षक – प्रशिक्षकांना बदलण्याची गरज नाही का ? तुकडोजी महाराज पुरोगामी व व्यवहार निपुन होते. मानवजातीच्या उज्वल भविष्यावर त्यांची नितांत श्रध्दा होती त्यांनी समाज जीवनाची नाडी बिनचूक ओळखली. सर्वप्रथम त्यांनी लोकांच्या मनातील भक्तीभावना जागृत केल्या व त्या भक्तिभावना सोबतच जनतेला समाजसेवेचे व राष्ट्रकार्याचे बोधामृत पाजले. डॉ. वि. भि. कोलते म्हणतात ' प्रथम जनतेच्या अंतः करणातील भक्तिभावना जागृत करुन त्यांच्या अंतः करणाचा ताबा घेतल्यानंतर हळूहळू त्यांच्यासमोर देश सेवेचे समाजसेवेचे ध्येय ठेवण्याचा महाराजांचा हा उपक्रम भला मोठा परिणामकारक वाटला मानसशास्त्र दृष्टया हा उपक्रम किती रास्त होता हे उमजले. '

अशा या संतांकडून काय घ्यावयाचे ?

- विद्यापीठाची पदवी नसतांनाही वेगवेगळे ग्रंथ चाळण्याची सवय
  ( गीता, दासबोध, भोज पत्रावळी )
- देशाटन / परिभ्रमनाची सवय, माणूस अनुभवातून सुज्ञ होतो.
- सतत निरीक्षणाचा व्यासंग व त्याचे विश्लेषण
- माणसांना समजण्याची वृत्ती ( मानसशास्त्र )
- मनोरंजनपूर्ण संप्रेषण साधनाचा वापर ( भजने )
- अनुभव लेखनाचा व्यासंग
- उपलब्ध साहित्याचा वापर ( खंजेरी )
- मनोरंजनातून लोकशिक्षण
- साहित्याला कर्तुत्वाची जोड

तुकडोजींना ऐकले तर संत म्हणतात.

या कोवळया कळयामाजी । लपले ज्ञानेश्वर, रविंद्र, शिवाजी
विकसना प्रकटतील समाजी । शेकडो महापुरुष

तुकडोजींचा वारसा आम्ही चालवतो असे मिरविणा–यांनी ' महापुरुष ' का निर्माण केले नाही ? सद्विवेक बुध्दीने विचार केला तर आम्ही तत्वज्ञान, मानसशास्त्र, व्यवस्थापन शिकवितो परंतू ते ' जगत ' नाही म्हणून शिक्षकांनी आता तरी बदलले पाहिजे व जगायला शिकले पाहिजे.

मुलास म्हणे सदवर्तनी रहा । आपण बिडी पीण्यास वाजवी दहा
मग उष्णतेने बोलतो पहा । साजरा रेलगाडी परी

– ग्रामगीता अध्याय 19 ओवी 45

दोनही संताचा विचार केला तर ते ख–या अर्थाने तत्वज्ञान जगले व त्यांच्या कृतीतून एक आदर्श आम्हा समोर ठेवून गेले. आज जग बदलले असेल तंत्रज्ञानाची प्रगती झाली असेल तरी त्यांचा विचार टाकावू मुळीच झाला नाही तर तंत्रज्ञानाने त्यांच्या तत्वज्ञानाला अधिक धार आणता येईल.